# अर्थमंगल

**आपल्या आर्थिक प्रगतीसाठी समर्पित**



**मा. आ. सुभाष (बापू) देशमुख**

संस्थापक अध्यक्ष, लोकमंगल परिवार

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥

# लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

## माहे फेब्रुवारी २०२६




## कार्यक्रम अहवाल

# ‘आपली पत आपली ओळख’

मंडळी,

नमस्कार

लोकमंगल सहकारी बँकेचं हे मासिक आपल्या हाती देताना आनंद होतोय. हे मासिक प्रकाशित करण्यापाठीमागे कारण हे की आज समाजातील मोठा घटक अजूनही बँकिंगपासून दूर आहे. बँका आपल्या सर्वसामान्यांच्या आर्थिक व्यवहारासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. पण विशेषत: स्त्रिया आणि अल्पशिक्षित व्यक्ती बँकेत व्यवहार करण्यापासून वंचित आहेत. पूर्वी स्त्रिया घरातल्या धान्याच्या डब्यात पैसे साठवायच्या. पण आज काळ बदलला. तुमच्या राहत्या ठिकाणापासून जवळपास एखादी तरी बँक असते. तेव्हा तुमची बचत बँकेत जमा करणं सगळ्याच दृष्टीने उपयुक्त असणार आहे. याच गोष्टीची जाणीव करुन देण्यासाठी, आर्थिक साक्षर करण्यासाठी हे मासिक प्रकाशित करीत आहोत.



पैसे बचत करणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. तुमच्याकडे १० रु. असले आणि तुम्ही त्यातला एक रु. बचत करायचं ठरवलं तरी काही काळानंतर तुमच्याकडे बऱ्यापैकी रक्कम उभी राहिल. वर्षभरात रोज १ रु. प्रमाणे बँकेत तुम्ही पैसे जमा केले तर वर्षभरात ३६५ रु. जमा झाले. आता या ३६५ रु. तर काही होत नाही मग बँकेत १००० रू. चे तुम्ही कर्ज मागू शकता. बँकेचा कर्मचारी विचार करेल की अरे ही व्यक्ती वर्षभर न चुकता पैसे बँकेत बचत करत होती. जर इतक्या निगुतीनं ही व्यक्ती पैसे जमा करते आहे तर तितक्याच निगुतीनं ती हे कर्जपण फेडेल. आणि मग तुम्हाला कर्ज मिळेल तुम्ही ते पैसे योग्यठिकाणी वापरून आपली गरज भागवू शकाल नाही का ? एकंदर काय तर बचतीची सवय तुमची पत निर्माण करेल. ही सुरूवात तुम्हाला सामान्य व्यक्तीपासून बँकेचा विश्वासाई ग्राहक ह्या ओळखीपर्यंत आणेल.

म्हणूनच विनंती करतो की लहानपणापासून आपल्या मुलांना बचतीची सवय लावा. कारण आज पालक आपल्या मुलांना महिन्याला पाचशे हजार रूपयाचा पॉकेट मनी देतात. तेव्हा त्या पॉकेट मनीतला थोडा भाग जर बँकेत जमा करायला शिकवलं व दिलेल्या पैशाच्या खर्चाचा हिशोब लिहायला सांगितले तर पैशाचं व बचतीचं महत्त्व लहानपणापासून मुलांवर बिंबवलं जाईल. आणि कुठेही कसाही पैसा वापरण्यावर नकळत त्याच्याकडून विचार व्हायला लागेल.

या सगळ्याचा विचार करूनच आर्थिक बाबींशी सगळ्यांनी डोळसपणे कनेक्ट व्हावं म्हणून हे ‘अर्थमंगल’. सगळ्यांचा आर्थिक स्तर सुधारावा, सगळ्यांच्या आयुष्यात नेहमीच मंगल व्हावं. ही प्रार्थना करतो आणि इंग्रजी नववर्षाच्या शुभेच्छा देतो आणि नियमित बचतीला या नववर्षात सुरूवात कराल ही अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

तुमचा

**सुभाष देशमुख**

# लोकमंगल परिवार आयोजित श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान बाळे येथे आई पर्यटन योजनेअंतर्गत व्यावसायिक कर्ज मार्गदर्शन व उद्योजक शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न

लोकमंगल परिवाराचे संस्थापक अध्यक्ष तथा दक्षिण सोलापूरचे आमदार श्री सुभाष बापू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या लोकमंगल परिवाराच्यावतीने बाळे येथील श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान येथे पर्यटन संचालनालय प्रादेशिक पर्यटन कार्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित व्यावसायिक कर्ज विषयक मार्गदर्शन व उद्योजक शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पर्यटन विभागाचे प्रकल्प अधिकारी श्री मयूर नांद्रे, श्री क्षेत्र खंडोबा देवस्थानचे अध्यक्ष श्री विनय ढेपे, मंदिराचे विश्वस्त श्री गणेश पुजारी, प्रभाकर भालेकर, बँकेचे संचालक श्री सतीश लामकाने, जितेंद्र लाड – नाईक, सौ नीता गवळी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे शाखाधिकारी श्री निशांत देवडकर यांनी केले, प्रास्ताविकामध्ये लोकमंगल परिवाराच्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. याप्रसंगी आई कर्ज योजनेचा लाभ घेतलेले उपस्थित लाभार्थी ग्राहकांनी आपले मनोगत व्यक्त करून लोकमंगल बँकेने अर्थसहाय्य केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. बँकेचे अधिकारी सुदन सुरवसे यांनी लोकमंगल बँकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध व्याज परतावा कर्ज योजनेची व विविध महामंडळाची व एक खिडकी योजनेची सविस्तर माहिती दिली. बाळे परिसरातील जास्तीत जास्त महिला उद्योजकांनी पर्यटन विभागाच्या आई कर्ज योजने अंतर्गत नियमित परतफेड करून व्याज परतावा लाभ घेऊन उद्योजक निर्माण व्हावे याकरिता लोकमंगल परिवार आपल्यासाठी संपूर्ण सहकार्य करेल असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगत मध्ये श्री क्षेत्र बाळे खंडोबा देवस्थानचे अध्यक्ष विनय ढेपे यांनी आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या विकासात्मक दूरदृष्टीतून खंडोबा मंदिर परिसरातील सर्व व्यापारी व व्यावसायिकानी पर्यटन विभागाच्या आई कर्ज योजनेचा लाभ घ्यावा आपले व्यवसाय वाढवावा येणाऱ्या प्रत्येक भाविकांना चांगली सेवा देऊन मंदिरे समितीचा व खंडोबा देवस्थानचा नावलौकिक वाढवावा असे आवाहन केले. सदर कार्यक्रमास बाळे येथील व्यापारी व महिला उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ श्रद्धा कुलकर्णी यांनी केले तर आभार सौ साधना डोंगरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता लोकमंगल परिवाराच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिसर घेतले.




लोकमंगल परिवार
श्रीक्षेत्र खंडोबा देवस्थान, वाळे
व्यवसायिक कर्ज व उद्योजक शिबीर


श्री खंडोबा श्री क्षेत्र वाळे


श्री खंडोबा


श्रीक्षेत्र खंडोबा देवस्थान, वाळे
AAi
व्यवसायिक कर्ज व उद्योजक शिबीर

# लोकमंगल बँक व सोलापूर शहर मूर्तिकार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित व्यावसायिक कर्ज मार्गदर्शन संदर्भात शहर मूर्तिकारांची बैठक संपन्न

बँकेचे अध्यक्ष तथा आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या लोकमंगल बँकेच्या वतीने सोलापूर शहरातील मूर्तिकार असोसिएशनच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांची आई पर्यटन कर्ज योजने बाबत मार्गदर्शन शिबिर व मूर्तिकारांची बैठक बँकेच्या प्रधान कार्यालयाच्या सभागृहात संपन्न झाली. प्रारंभी लोकमंगल बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राजेशसिंह बायस यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये बँकेच्या विविध कर्ज योजनेची,विविध महामंडळाची व एक खिडकी योजनेची सविस्तर माहिती देऊन सोलापूर शहरातील जास्तीत जास्त मूर्तिकारांनी या कर्ज योजनेचा लाभ घेऊन आर्थिक सक्षम व्हावे असे सांगितले याकरिता लोकमंगल बँक आपल्या सर्वांच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहील अशी ग्वाही दिली. पर्यटन संचालनालय पुणे येथील प्रकल्प अधिकारी श्री मयूर नांद्रे यांनी उपस्थित असलेल्या मूर्तिकार बांधवांना पर्यटन विभागाच्या आई कर्ज योजनेचा लाभ कसा घ्यावा, याकरिता कोणत्या कागदपत्राची आवश्यकता आहे, आई कर्ज योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्रता प्रमाणपत्र कसा काढावा यासंदर्भात मार्गदर्शन केले. याप्रसंगी व्यासपीठावर बँकेचे संचालक श्री जितेंद्र लाड, मूर्तिकार असोसिएशनचे अध्यक्ष श्री कणकी साहेब यांच्या समवेत सोलापूर शहरातील विविध भागातील मूर्तिकार उपस्थित होते. सदरची बैठक यशस्वी करण्याकरिता बँकेच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.








MAHARASHTRA TOURISM
पर्यटन संचलनालय प्रादेशिक पर्यटन कार्यालय, पुणे
सोलापूर शहर मुर्तीकार असोसिएशन
आयोजित
AAi
पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजिकांचे सक्षमीकरण
'आई' पर्यटन योजनेअंतर्गत व विविध शासकीय योजनेअंतर्गत
व्यवसायिक कर्ज व उद्योजक शिबीर
वेळ व दिनांक
गुरूवार दि.०५ फेब्रुवारी २०२६ रोजी
सायंकाळी ४.०० वाजता
स्थळ

# विविध शाखेत शिवजयंती साजरी

पुणे शाखेमध्ये हिंदवी स्वराज्य संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, (यशवंत, कीर्तीवंत, सामर्थ्य वंत, वरदवंत, पुण्यवंत, नीतीवंत, जाणता राजा, ) स्वराज्याचे स्वप्न साकार करणाऱ्या महापुरुषाला त्रिवार वंदन आणि मानाचा मुजरा. आज छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आपल्या बँकेच्या पुणे शाखेत साजरी करण्यात आली. छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन आपल्या बँकेचे माननीय श्री अमोल उदावंत सर (व्हॅल्युएटर) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास शाखेचे ग्राहक, सल्लागार व सभासद व सर्व शाखा कर्मचारी वर्ग उपस्थित होते.



छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आपल्या बँकेच्या अक्कलकोट शाखेत साजरी करण्यात आली याप्रसंगी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन आपल्या बँकेचे माननीय स्थानिक सल्लागार स्वप्नील  शहा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास शाखा व्यवस्थापक व  कर्मचारी वर्ग उपस्थित होते.



# विविध शाखेत शिवजयंती साजरी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आपल्या बँकेच्या बार्शी शाखेत साजरी करण्यात आली. छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन माननीय संचालक श्री. जॉन चोप्रा साहेब यांच्या हस्ते करून छत्रपती शिवाजी महाराज यांना त्रिवार मुजरा करण्यात आला. या कार्यक्रमास सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.



हिंदवी स्वराज संस्थापक रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आपल्या बँकेच्या सांगोला शाखेत साजरी करण्यात आली. छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन माननीय संचालक श्री विजय कुलकर्णी साहेब यांच्या हस्ते करून छत्रपती शिवाजी महाराज यांना त्रिवार मुजरा करण्यात आला. या कार्यक्रमास शाखा सल्लागार ॲड. गजानन भाकरे, बँकेचे सभासद आप्पासाहेब शिंदे, शाखा व्यवस्थापक शिवाजी दरेकर व सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते



# लोकमंगल बँकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती उत्सव सोहळा व शाही पालखीचा स्वागत सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त लोकमंगल बँकेच्या मुख्य शाखेत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची महापूजा बँकेचे अध्यक्ष तथा आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या हस्ते मोठ्या जल्लोषात संपन्न झाला.याप्रसंगी बँकेचे संचालक देवानंद चिलवंत,सिद्धार्थ सर्जे,जितेंद्र लाड – नाईक,बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष तथा आमदार सुभाष बापू देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा देताना छत्रपती शिवाजी महाराजांचे किमान एक तर गुण आपल्यामध्ये अंगीकृत करून घ्यावा, शिवरायांचे विचार आपल्यामध्ये रुजूवावे तरच खरी शिवजयंती आपण साजरा केल्याचा आनंद आपल्याला होईल असे प्रतिपादन व्यक्त केले.याप्रसंगी संभाजी आरमारच्या शाही पालखी सोहळ्याचे पुष्पवृष्टी करून स्वागत व पालखी सोहळ्याचे पूजन बँकेच्या वतीने बँकेच्या प्रवेशद्वारासमोर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सर्व सहभागी शिवभक्तांना बँकेच्या वतीने सुगंधी दूध व पाणी बॉटलचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी शाही पालखी सोहळ्याच्या महापूजा दरम्यान संभाजी आरमार चे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत बापू डांगे व कार्याध्यक्ष तथा नगरसेवक शिवाजी तात्या वाघमोडे, प्रसिद्ध शिवव्याख्याते शिवरत्न शेटे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बँकेचे अधिकारी व कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.






छत्रपती शिवाजी महाराज
जयंतीनिमित्त मानाचा मुजरा...!
सर्व शिवभक्तांचे हार्दिक स्वागत...!
श्री. प्रदीप नागणे
समस्त संचालक मंडळ
लोकमंगल
परिवार



# संवाद बैठक

लोकमंगल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर शाखा हडपसर पुणे सौजन्याने आयोजित रक्षा लेखा हाऊसिंग सोसायटी कोरेगाव पार्क पुणे या ठिकाणी आपल्या बँकेचे माननीय मुख्यकार्यकारी अधिकारी श्री राजेशसिंह बायस यांच्या अध्यक्षतेखाली सोसायटीमधील सर्व सभासदांची बैठक घेण्यात आली. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी बँकेच्या वतीने श्री अंकुश गायकवाड यांनी लोकमंगल परिवाराविषयी सामाजिक कार्याची माहिती दिली व बँकेच्या ठेव, कर्ज, शेअर्स याबाबत माहिती देऊन बँकेच्या माध्यमातून राबवत असलेल्या विविध शासकीय कर्ज योजनांची सविस्तर माहिती दिली. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री बायस सर यांनी कार्यक्रमास उपस्थित सोसायटीच्या सभासदांना बँकिंग कामकाजाविषयी मार्गदर्शन केले. यानंतर सर्वांचे आभार मानून सर्वांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रमास बँकेच्या वतीने श्री अंकुश गायकवाड, श्री कुणाल खरोटे, श्री चेतन नालवार, व श्री रोहिदास घोगरे कर्मचारी उपस्थित होते.





# प्रधान मंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग सबसिडी योजनेची माहिती

दिनांक २५/०२/२०२६ रोजी लोकमंगल महाविद्यालय वडाळा येथील लोकमंगल ॲग्री क्लिनिक व बिझनेस सेंटर वडाळा आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांना लोकमंगल बँक, राज्य शासनाच्या विविध महामंडळ अंतर्गत कर्ज व्याज परतावा योजना तसेच प्रधान मंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग सबसिडी योजनेची माहिती देण्यात आली,तसेच बँकेच्या विविध सेवा,कर्जासाठी आवश्यक असलेले कागदपत्रे,महामंडळ ङ्जख व व्याज परतावा साठी लागणारे कागदपत्रे इ बाबत सविस्तर चर्चा करून मार्गदर्शन करण्यात केले.





# मराठा इंटरप्रीनिएस असोसिएशन पुणे आयोजित इंटरनॅशनल बिझनेस एक्सपो २०२६ मध्ये लोकमंगल बँकेचा सहभाग

पुणे येथील एग्रीकल्चर ग्राउंड सिंचन नगर येथील इंटरनॅशनल बिजनेस एक्सपो २०२६ मध्ये लोकमंगल बँकेने स्टॉलच्या माध्यमातून सहभाग नोंदविला आहे. या माध्यमातून पुणे येथील विविध क्षेत्रातील उद्योजकांना विविध महामंडळाच्या व्याज परतावा कर्ज योजनेची माहिती,ठेवीची माहिती,बँकेचे विविध वैशिष्ट्ये व बँकेची सविस्तर माहिती ब्राऊचर व पोम्प्लेटच्या माध्यमातून सर्व सहभागी उद्योजकांना व सदरचा बिजनेस एक्सपो पाहण्यास येणाऱ्या पुणेकरांना देण्यात आले.

पुणे येथील इंटरनॅशनल बिझनेस एक्सपो २०२६ मध्ये आयोजित उद्योजकांसमवेत संवाद या कार्यक्रमात बिझनेस एक्सपो मध्ये सहभागी झालेल्या सर्व उद्योजकांना वन टू वन संवाद साधून आपल्या लोकमंगल बँकेच्या सर्व योजनांची व सेवांची उद्योजकांना सविस्तर माहिती देण्यात आली.









# विविध शाखेमार्फत वाहन कर्ज वितरण

लोकमंगल को–ऑपरेटिव बँक लिमिटेड सोलापूर शाखा हडपसर पुणे मार्फत शिंपणे सरकार टूर्स अँड ट्रॅव्हल्स (प्रो सुशीला नरेश शिंपणे) यांना आई पर्यटन योजनेअंतर्गत शिफ्ट डिजायर गाडीसाठी कर्ज अदा करून आज बँकेसमोर पूजन करताना स्वत: मालक व बँक कर्मचारी वर्ग.




लोकमंगल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर शाखा हडपसर पुणे मार्फत राधा टूर्स अँड ट्रॅव्हल्स (प्रो सौ अश्विनी आजिनाथ बर्डे) यांना आई पर्यटन योजनेअंतर्गत ईरटीका गाडीसाठी कर्ज अदा करून आज बँकेसमोर बँकेचे HR सर श्री राहुल कुलकर्णी सो व लोकमंगल मल्टीस्टेट चे अधिकारी यांचे मार्फत चावी प्रदान करण्यात आली यावेळी पूजन करताना स्वत: मालक व कर्मचारी वर्ग.



# विविध शाखेमार्फत वाहन कर्ज वितरण

लोकमंगल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर, मुख्य शाखा , महाराष्ट्र शासन पर्यटन विभाग आई योजना अंतर्गत लक्ष टूर्स अँड ट्रॅव्हल्स सोलापुर, कर्जदाराचे नाव :– सौ.अर्चना सावंत यांना लोकमंगल बँक मुख्य शाखा येथे स्विफ्ट डिझायर गाडी पूजन व चावी प्रदान स्वीय सहाय्यक श्री किरण पोतदार व श्री दीपक चोपडे यांच्या हस्ते करण्यात आले. बँकेचे शाखाधिकारी.श्री धर्मराज मळगे अधिकारी सौ.अनिता जगदाळे, श्री रमेश असंगे, सौ शिल्पा माने श्री.सिद्राम बिराजदार, श्री.रामचंद्र शिवपुजे यांच्या हस्ते करण्यात आला, याप्रसंगी बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.



लोकमंगल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर, मुख्य शाखा, महाराष्ट्र शासन पर्यटन विभाग अंतर्गत आई योजना मध्ये ,व्यवसायाचे नाव: – राजमाता एंटरप्राइजेस कर्जदाराचे नाव रत्नकला सचिन जेबंगी यांना लोकमंगल बँक मुख्य शाखा येथे गाडीचे पूजन व चावी प्रदान बँकेचे शाखाधिकारी. श्री धर्मराज मळगे व अधिकारी. अनिता जगदाळे मॅडम, रमेश आसंगे यांच्या हस्ते करण्यात आला, याप्रसंगी बँकेचे कर्मचारी उपस्थित होते



# विविध शाखेमार्फत वाहन कर्ज वितरण

लोकमंगल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर शाखा हडपसर पुणे मार्फत अक्षय टूर्स अँड ट्रॅव्हल्स (प्रो सौ हिराबाई दादासाहेब जानकर) यांना आई पर्यटन योजनेअंतर्गत ईरटीका गाडीसाठी कर्ज अदा करून आज आपल्या बँकेसमोर पूजन करताना स्वत: मालक व बँक कर्मचारी वर्ग.



लोकमंगल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर, पंढरपूर शाखा, महाराष्ट्र शासन पर्यटन विभाग अंतर्गत आई योजना मध्ये व्यवसायाचे नाव: – मंगलम टूर्स अँड ट्रॅव्हल, सौ मनीषा शिवाजी शिंदे यांना लोकमंगल बँक पंढरपूर शाखा येथे गाडीचे पूजन व चावी प्रदान बँकेचे शाखाधिकारी. श्री विनोद जगदाळे यांच्या हस्ते करण्यात आला, याप्रसंगी बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.



# विविध शाखेमार्फत वाहन कर्ज वितरण

लोकमंगल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर शाखा हडपसर पुणे मार्फत शिव टूर्स अँड ट्रॅव्हल्स ( प्रोप्रा. सौ. आशा आनंदा आटोळे) यांना आई पर्यटन योजनेअंतर्गत स्विफ्ट डिझायर गाडी साठी कर्ज अदा करून आज बँकेसमोर पूजन करताना स्वत: मालक व बँक कर्मचारी वर्ग.



लोकमंगल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर शाखा हडपसर पुणे मार्फत महालक्ष्मी टूर्स अँड ट्रॅव्हल्स (प्रोप्रा. सौ. सुचिता रमाकांत काळे) यांना आई पर्यटन योजनेअंतर्गत ओरा गाडीसाठी कर्ज अदा करून आज बँकेसमोर पूजन करताना स्वत: मालक व बँक कर्मचारी वर्ग.



# विविध शाखेमार्फत वाहन कर्ज वितरण

लोकमंगल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर, मुख्य शाखा , महाराष्ट्र शासन पर्यटन विभाग आई योजना अंतर्गत  दुर्गामाता टूर्स अँड ट्रॅव्हल्स देगाव सोलापूर, कर्जदाराचे नाव :– अशा प्रकाश भातलवंडे यांना लोकमंगल बँक मुख्य शाखा येथे ईरटीका गाडी पूजन व चावी प्रदान केली. बँकेचे शाखाधिकारी. श्री धर्मराज मळगे  व अधिकारी. अनिता जगदाळे मॅडम,  रमेश आसंगे, सौ श्रद्धा कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला, याप्रसंगी बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.




लोकमंगल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर,मुख्य शाखा, महाराष्ट्र शासन पर्यटन विभाग आई योजना अंतर्गत , स्वामी टूर्स अँड ट्रॅव्हल्स मु.धारसंग पो.मुंढेवाडी ता.अक्कलकोट, कर्जदाराचे नाव :– सौ.मंगल राजशेखर उमराणी  यांना  लोकमंगल बँक मुख्य शाखा येथे ईरटीका गाडी पूजन व चावी प्रदान केली. बँकेचे शाखाधिकारी.श्री धर्मराज मळगे व अधिकारी श्री.रमेश आसंगे,श्री.सुभाष सिदगिद्दी,श्री.सागर जाधव व श्री.प्रवीण खरात यांच्या हस्ते करण्यात आला, याप्रसंगी बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.



# वर्तमानपत्रातून प्रसिध्दी...!

## दिव्य मराठी

शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६

## आई योजनेंतर्गत २३५ महिलांना २५ कोटींचे कर्ज

**बाळेतील खंडोबा मंदिरात व्यावसायिकांना मार्गदर्शन : पर्यटनवाढीसाठी लोकमंगल बँकेचा पुढाकार**

**प्रतिनिधी** | सोलापूर



राज्य सरकारच्या आई पर्यटन योजनेंतर्गत व्यापारी व व्यावसायिकांना लोकमंगल बँकेच्या वतीने कर्ज पुरवठा केला जात आहे. आजवर २३५ महिला व्यावसायिकांना तब्बल २५ कोटी रुपयांचे कर्ज वितरीत करण्यात आले आहे. महिला व्यावसायिकांनी धार्मिक व नैसर्गिक पर्यटनाच्या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना चांगल्या सुविधा देऊन जिल्ह्याचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन पर्यटन विभागाचे प्रकल्प अधिकारी मयूर नांद्रे यांनी केले.

गुरुवारी, बाळेतील खंडोबा देवस्थान येथे आई पर्यटन योजनेंतर्गत व्यावसायिक कर्ज मार्गदर्शन व उद्योजक शिबिर झाले. पर्यटन संचालनालय (पुणे) आणि लोकमंगल परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष विनय ढेपे, विश्वस्त गणेश पुजारी, सतीश लामकाने, लोकमंगल बँकेचे शाखाधिकारी निशांत देवडकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रद्धा कुलकर्णी यांनी केले.

### योजनेतून स्वत:चे उद्योग उभारण्याचे आवाहन

बाळे परिसरातील महिलांनी या योजनेचा लाभ घेऊन स्वत:चे उद्योग उभे करावेत, असे आवाहन करण्यात आले. आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनातून व्यापाऱ्यांनी आपला व्यवसाय वाढवून भाविकांना उत्तम सेवा द्यावी आणि देवस्थानचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष विनय ढेपे यांनी केले.

## लोकमत

## लोकमंगलतर्फे शिवपालखीचे स्वागत

**लोकमत न्यूज नेटवर्क**



लोकमंगल बँकेतर्फे आयोजित शिवजयंती व शाही पालखीच्या स्वागत सोहळ्यात आमदार सुभाष देशमुख व आदी.

**सोलापूर :** लोकमंगल बँकेच्या मुख्य शाखेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती व संभाजी आरमारच्या शाही पालखीचा स्वागत सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. बँकेचे अध्यक्ष तथा आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते शिवमूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी शिवरायांचा किमान एक तरी गुण सर्वांनी अंगीकारावा, तरच खऱ्या अर्थाने शिवजयंती साजरी होईल, असे आवाहन आमदार देशमुख यांनी केले.

याप्रसंगी संचालक देवानंद चिलवंत, सिद्धार्थ सर्जे, जितेंद्र लाड-नाईक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस प्रामुख्याने उपस्थित होते. बँकेच्या प्रवेशद्वारावर शाही पालखीवर पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले व शिवभक्तांना सुगंधी दूध आणि पाण्याचे वाटप करण्यात आले. यावेळी संभाजी आरमारचे संस्थापक श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे आणि शिवव्याख्याते शिवरत्न शेटे यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. (वा. प्र.)

Hello Solapur
Page No. 2 Feb 20, 2026
Powered by: erelego.com

# वर्तमानपत्रातून प्रसिध्दी...!

सोलापूर
तरुण भारत
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

## ‘लोकमंगल’च्यावतीने पालखी सोहळ्याचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ फेब्रुवारी-**



छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त संभाजी आरमारच्या वतीने काढण्यात आलेल्या पालखी सोहळ्याचे लोकमंगल बँकेच्या वतीने स्वागत करण्यात आले. ‘लोकमंगल’चे संस्थापक तथा आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते शिवमुर्तीची महापूजा करण्यात आली.

आमदार सुभाष देशमुख याप्रसंगी बोलताना म्हणाले, प्रत्येकांनी छत्रपती शिवाजी यांचे किमान एक तरी गुण अंगीकारावे. समाजामध्ये शिवरायांचे विचार रुजवावे. दरम्यान, लोकमंगल बँकेच्या वतीने शिवभक्तांना सुगंधी दूध व पाणी वाटप करण्यात आले.

याप्रसंगी नगरसेवक शिवाजी वाघमोडे, शिवव्याख्याते डॉ.शिवरत्न शेटे, संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, देवानंद चिलवंत, सिध्दार्थ सर्जे, जितेंद्र लाड-नाईक, राजेशसिंह बायस यांची प्रमुख उपस्थिती होती.



**सोलापूर :** लोकमंगल बँकेत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीप्रसंगी आमदार सुभाष देशमुख, राहुल कोल्हटकर आदी.

सकाळ

## लोकमंगल बँकेतर्फे शिवजयंती उत्सव सोहळा

■ **सकाळ वृत्तसेवा**

सोलापूर, ता. १९ : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त लोकमंगल बँकेच्या मुख्य शाखेत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची महापूजा बँकेचे अध्यक्ष तथा आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते झाली. याप्रसंगी बँकेचे संचालक देवानंद चिलवंत, सिद्धार्थ सर्जे, जितेंद्र लाड-नाईक, बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस यांची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार देशमुख म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांचा किमान एक तर गुण आपल्यामध्ये अंगीकृत करून घ्यावा. शिवरायांचे विचार आपल्यामध्ये रुजवावे तरच खरी शिवजयंती आपण साजरी केल्याचा आनंद आपल्याला होईल. याप्रसंगी संभाजी आरमारच्या शाही पालखी सोहळ्याचे पुष्पवृष्टी करून स्वागत व पालखी सोहळ्याचे पूजन बँकेच्या वतीने बँकेच्या प्रवेशद्वारासमोर करण्यात आले. यावेळी सर्व सहभागी शिवभक्तांना बँकेच्या वतीने सुगंधी दूध व पाणी बॉटलचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी शाही पालखी सोहळ्याच्या महापूजा दरम्यान संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे व कार्याध्यक्ष तथा नगरसेवक शिवाजी वाघमोडे, प्रसिद्ध शिवव्याख्याते शिवरत्न शेटे यांचा सन्मान झाला. यावेळी बँकेचे अधिकारी व कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकमंगल बँक

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥

## लोकमंगल को-ऑप बँक लि., सोलापूर

प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर.
फोन : (०२१७) २७३५५०३/६६



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख
अध्यक्ष तथा आमदार, दक्षिण सोलापूर.

# तुमच्या प्रगतीला... आमचं आर्थिक पाठबळ...!

## * महाराष्ट्र शासनाचा उपक्रम *

१0000 उद्योजक निर्मितीचा संकल्प

## १२% व्याज परतावा कर्ज योजना

सर्व प्रकारच्या व्यवसायाकरिता बँकेकडून आर्थिक साहाय्य

महामंडळ अंतर्गत ३00 कोटी कर्ज वाटप उद्दिष्टपूर्ती

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
**अण्णासाहेब पाटील**
आर्थिक मागास विकास महामंडळ अंतर्गत



महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
**जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर**
**आर्थिक विकास महामंडळ**

कमाल कर्ज मर्यादा रक्कम
**रू. १५ लाख**

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय**
वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित
उपकंपनी – शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत



महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
**वसंतराव नाईक**
विमुक्त जाती व भटक्या जमाती
विकास महामंडळ (मर्यादित) अंतर्गत





**सर्व प्रकारच्या अन्न प्रक्रिया व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध.**
**प्रधानमंत्री फुड प्रोसेसिंग योजने अंतर्गत ३५% पर्यंत सबसीडी**

MAHARASHTRA TOURISM

**पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजिकांचे सक्षमीकरण**
महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
'आई' महिला केंद्रित पर्यटन धोरण अंतर्गत
**व्याज परतावा योजना**
(फक्त महिलांसाठी)





कमाल कर्ज मर्यादा रक्कम
**रू. १५ लाख**



## वैशिष्ट्ये

* व्यवसाय विस्तार / वाढीसाठी कर्ज * नवीन व्यवसाय उभारणीसाठी कर्ज * कमीत कमी कागदपत्रे व त्वरीत कर्ज मंजुरी

## आवश्यक कागदपत्रे

* आर्थिक विकास महामंडळाचे पात्रता प्रमाणपत्र * व्यवसायाचे सर्व नोंदणीपत्र * उत्पन्नाचे पुरावे
* आधारकार्ड, पॅन कार्ड, लाईट बील * दोन सक्षम जामीनदार * तारण देणाऱ्या मिळकतीची कागदपत्रे * प्रोजेक्ट रिपोर्ट
* जुना व्यवसाय असल्यास मागील ३ वर्षाचे आर्थिक ताळेबंद पत्रक * नवीन व्यवसाय असल्यास पुढील ५ वर्षाचे प्रोजेक्शन
* चालू बँक खात्याचा १ वर्षाचा खाते उतारा * लोकमंगल बँकेच्या नियम व अटीनुसार कर्ज देण्यात येईल.

**अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा**

# लोकमंगल बँक

## लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥

प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर.
फोन : (०२१७) २७३५५०३/६६



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख
अध्यक्ष तथा आमदार, दक्षिण सोलापूर.

## तुमच्या प्रगतीला... आमचं आर्थिक पाठबळ...!

## * ठेवीवरील आकर्षक व्याजदर *

| मुदत | व्याजदर |
|---|---|
| ७ दिवस ते ४५ दिवस | ३.५०% |
| ४६ दिवस ते १७९ दिवस | ४.००% |
| १८० दिवस ते २१० दिवस | ४.५०% |
| २११ दिवस ते १ वर्षापेक्षा कमी | ६.००% |
| १ वर्षी ते २ वर्षापेक्षा कमी | ७.५०% |
| २ ते ३ वर्ष | ७.७५% |
| ३ वर्षापेक्षा जास्त | ७.००% |
| बचत खातेसाठी | २.५० % |
| दामदुप्पट | १२० महिने |

**ज्येष्ठ नागरिकांना**
**अर्धा टक्का ज्यादा व्याज**

**३६५ दिवस अविरत सेवा**




लॉकर सुविधा उपलब्ध

**अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा**



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख
अध्यक्ष तथा आमदार, द. सोलापूर.

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥

# लोकमंगल बँक

## लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर.
फोन : (०२१७) २७३५५०३/६६

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

# तुमच्या प्रगतीला... आमचं आर्थिक पाठबळ...!

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ

योजने अंतर्गत (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

₹ १५ लाखापर्यंत कर्जास
0%* व्याजदर (* नियम व अटी लागू)

## सर्व प्रकारच्या व्यवसाय वाढीसाठी व व्यावसायिक वाहन खरेदीकरिता

### वैयक्तीक व्याज परतावा योजना (IR-1)

* ऑनलाईन अर्ज प्रक्रिया परिपूर्ण अर्जानंतर (LOI) मिळेल.
* बँक कर्ज मंजुरीनंतर कर्जाचे हप्ते नियमित व वेळेवर भरल्यास व्याज परतावा मिळेल.
* या योजनेची मर्यादा रू. १ लाख ते १५ लाखापर्यंत आहे.
* १५ लाखाच्या कर्जास ४.५ लाख व्याज परतावा करण्यात येतो.
* व्याज परताव्याचा कालावधी ५ वर्षे आहे.
* व्याज परतावा जास्तीत जास्त १२% दिला जातो.

### कर्ज कोणाला -

* कृषी सलंग्न पारंपारिक उपक्रमासाठी
* लघु मध्यम उद्योगासाठी
* उत्पादन, व्यापार, विक्री व सेवाक्षेत्रासाठी
* सदर कर्ज योजना प्रामुख्याने मराठा प्रवर्गाकरिता आहे.
* उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असणे अनिवार्य आहे.
* कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या आत असावे.
* या योजनेत नवीन व्यवासाय सुरूवात करण्यासाठी व सध्या सुरू असलेला व्यवसाय - उद्योगवाढीसाठी घेतलेल्या कर्जास व्याजाचा परतावा दिला जातो.

### पात्रता प्रमाणपत्र (LOI) काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे -

* सध्या राहत असलेल्या ठिकाणाचा पुरावा. * आधारकार्ड दोन्ही बाजू झेरॉक्स
* पॅनकार्ड * रेशनकार्ड दोन्ही बाजूस * कुटुंबाचा उत्पन्नाचा तहसिल दाखला
* हिंदू मराठा असा उल्लेख असलेला जातीचा दाखला (तहसिलदार)
* आधार व पॅनकार्ड वरील जन्मतारीख एकसारखी असावी.

### गटप्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना (IR-2)

* ऑनलाईन अर्ज प्रक्रिया परिपूर्ण अर्जानंतर (LOI) मिळेल.
* बँक कर्ज मंजुरीनंतर कर्जाचे हप्ते नियमित व वेळेवर भरल्यास व्याज परतावा मिळेल.
* भागीदारी संस्था, सहकारी संस्था, बचत गट, एलएलपी कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट / संस्था लाभास पात्र असतील.
* या योजनेअंतर्गत किमान १ किंवा २ पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटांनी एकत्र येऊन

- दोन व्यक्तींसाठी कमाल रू. २५ लाखांच्या मर्यादेवर
- तीन व्यक्तींसाठी रू. ३५ लाखांच्या मर्यादेवर
- चार व्यक्तींसाठी रू. ४५ लाखांच्या मर्यादेवर
- पाच व पाचपेक्षा अधिक व्यक्ती असल्यास रू. ५० लाखांपर्यंतचा
- व्यवसाय / उद्योग कर्जावर ५ वर्षापर्यंत १२% व्याज परतावा दिला जातो.

या योजनेमध्ये FPO गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरिता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील देखील व्याज परतावा नियमानुसार महामंडळ करेल.

* जास्तीत जास्त रू. १५ लाखापर्यंत व्याज रकमेचा परतावा.
* व्याज परताव्याचा कालावधी ५ वर्षे आहे.

## अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख

# लोकमंगल बँक

## लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥

प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर.

फोन : (०२१७) २७३५५०३/६६

AAi

# तुमच्या प्रगतीला... आमचं आर्थिक पाठबळ...!

₹१५ लाखापर्यंतच्या कर्जास

१२%* व्याज परतावा

* नियम व अटी लागू

DIRECTORATE MAHARASHTRA TOURISM

AAi

## पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजिकांचे सक्षमीकरण

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम



'आई' महिला केंद्रित पर्यटन धोरण अंतर्गत

## व्याज परतावा योजना (फक्त महिलांसाठी)





* कृषी पर्यटन केंद्र * हॉटेल व्यवसाय * रेस्टॉरंट * कॅफे * निवास न्याहरी * बेकरी * टूर मार्गदर्शक * ट्रॅव्हल एजंट
* टूर ऑपरेटर * टूर अँण्ड ट्रॅव्हल एजन्सी * आयुर्वेद * योगा केंद्र * हाऊस बोट * टेंट हाऊस * पर्यटन व्हीला
* साहसी पर्यटन केंद्र * पर्यटन सुविधा केंद्र * होम स्टे * रिसॉर्ट * ट्री हाऊस * इतर पर्यटन व्यवसाय* ई व्हेईकल
* मेडीकल पर्यटन * वेलनेस सेंटर * हॅण्ड क्राफ्ट * आर्ट अँण्ड कल्चर * स्थानिक उत्पादन विक्री केंद्रे
* धार्मिक स्थळी निर्माल्य* उपहार गृह * फास्ट फूड * महिला चलित कॉमन किचन * प्रसाद विक्री केंद्र
* खाद्यपदार्थ विक्रेते * ईव्हेंट मॅनेजमेंट






महिला सक्षमीकरणासाठी हॉटेल व्यवसाय व टुर्स अँण्ड ट्रॅव्हल्स व्यवसायासाठी व पर्यटन विभागाशी निगडीत असलेल्या सर्व व्यवसायाकरिता कर्ज उपलब्ध

कमाल कर्ज मर्यादा रक्कम

**रू. १५ लाख**

## पात्रता प्रमाणपत्र (LOI) काढण्यासाठी खालीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे

* आधारकार्ड झेरॉक्स दोन्ही बाजू * पॅन कार्ड प्रत * शॉप अॅक्ट / उद्यम आधार यामध्ये महिला कामगार संख्या ५०% पेक्षा अधिक असावे. * सदर व्यवसाय महिलांच्या मालकी हक्काचे असल्याचे दर्शविण्यासाठी १०० रू. स्टँम्प पेपरवर रितसर नोटरी प्रतिज्ञापत्र जोडावे. * अन्न व औषध प्रशासन परवाना (खाद्य व्यवसायासाठी अनिवार्य). * जीएसटी क्रमांक (आवश्यकतेनुसार) * रद्द केलेला एक चेक * प्रकल्प संकल्पना (५०० शब्दात).

## कर्ज मंजुरी पत्र अपलोड करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

* बँक कर्ज मंजुरी पत्र * कर्ज रिपेमेंट शेड्युल / हप्ते पत्र * कर्ज खाते उतारा. * बँकेकडील कागदपत्रांवर बँकेचा सही शिक्का असणे आवश्यक आहे. * बचत खात्याचे चेक * गाडीचे आर. सी. बुक दोन्ही बाजूचे.

## दरमहा नियमित हप्ता भरल्यानंतर क्लेम (व्याज परतावा) साठी आवश्यक कागदपत्रे

* नियमित कर्ज हप्ता भरलेले स्टेटमेंट * उद्योग / शॉपचे २ फोटो. (व्यवसायासोबतचा फोटो)



# अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा



# लोकमंगल बँक

## लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, शोभा नर्सिंग होम शेजारी, सोलापूर.

फोन : (०२१७) २७३५५०१/०२



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख
अध्यक्ष तथा आमदार, द. सोलापूर.

आत्मनिर्भर भारत मोहिमेंतर्गत कृषि विभागाची महत्वाकांक्षी योजना

**केंद्र शासन सहाय्यित**

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME)

## खाद्यपदार्थ प्रक्रिया (Food Processing) अंतर्गत उद्योग





१) बेकरी उद्योग
२) केळीचे चिप्स निर्मिती उद्योग
३) बिस्किट निर्मिती उद्योग
४) पोहा निर्मिती उद्योग
५) काजू प्रक्रिया उद्योग
६) ब्रेड/टोस्ट निर्मिती उद्योग
७) केक निर्मिती उद्योग
८) पेढा निर्मिती उद्योग
९) कोकोनट मिल्क पावडर उद्योग
१०) कस्टर्ड पावडर निर्मिती उद्योग
११) दलीया निर्मिती उद्योग
१२) डाळमिल
१३) पिठाची गिरणी
१४) फ्रेंच फ्राय निर्मिती उद्योग
१५) फ्रुट ज्युस निर्मिती उद्योग
१६) अद्रक – लसुण पेस्ट निर्मिती उद्योग
१७) विविध तेल (तेलघाणा लाकडी/यांत्रिक)
१८) हिंगनिर्मिती उद्योग
१९) मध निर्मिती उद्योग
२०) जैम व जेली निर्मिती उद्योग
२१) लिंबू शरबत निर्मिती उद्योग
२२) नुडल्स/शेवई निर्मिती उद्योग
२३) पनीर/चिज निर्मिती उद्योग
२४) पापड निर्मिती उद्योग
२५) लोणचे निर्मिती उद्योग
२६) आलू चिप्स निर्मिती उद्योग
२७) हळद / मसाले निर्मिती उद्योग
२८) टोमैटो प्रोसेसिंग उद्योग



खवा उद्योग मशीन ३५ टक्के अनुदान



बटाटा चिप्स उद्योग ३५ टक्के अनुदान

## सदर उद्योगांकरिता ३५% अनुदान उपलब्ध आहे.



पेढे उद्योग ३५ टक्के अनुदान



मिरची पावडर मशीन उद्योग ३५ टक्के अनुदान



हळद प्रक्रिया उद्योग ३५ टक्के अनुदान
(जास्तीत जास्त दहा लाख रुपये अनुदान)

- इच्छुक लाभार्थ्यांनी आपली आवश्यक कागदपत्रे खालीदर्शवलेल्या संसाधन व्यक्ती यांच्याकडे जमा करावी.
- तुमचा बँकेचा प्रस्ताव संबंधित संसाधन व्यक्ती तयार करतील. तसेच उद्योग स्थापनेबाबत मार्गदर्शन करतील.
- उद्योग स्थापन झाल्यावर अनुदान प्रस्ताव तयार करून अनुदान तुमच्या खात्यावर जमा करण्याची प्रक्रिया करतील.

जर वरील यादी पैकी कोणताही उद्योग आधीच अस्तित्वात व वापरात असेल तर, त्या उद्योगाचे विस्तारीकरण करण्यासाठी अर्ज करता येईल व विस्तारीकरण पूर्ण केल्यानंतर अनुदान सुध्दा भेटेल.

**लाभार्थी :-**

१) वैयक्तिक लाभार्थी (शेतीची अट नाही)
२) गट लाभार्थी (महिला व पुरूष गट)
३) शेतकरी उत्पादक कंपनी (FPO)
४) भागीदार संस्था

**आवश्यक कागदपत्रे**

१) पॅन कार्ड
२) आधार कार्ड
३) लाइट बिल किंवा रेशन कार्ड
४) बँक पासबुक
५) मशिनरी कोटेशन



## अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख
अध्यक्ष तथा आमदार, द. सोलापूर.

# लोकमंगल बँक

|| अखंड गतीतून सार्थकता ||

## लोकमंगल को-ऑप बँक लि., सोलापूर

प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर.
फोन : (०२१७) २७३५५०३/६६

# तुमच्या प्रगतीला... आमचं आर्थिक पाठबळ...!

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मर्या.

(इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.)

**₹ १५ लाखापर्यंत कर्जास**
**१२%* व्याज परतावा**
(* नियम व अटी लागू)

## सर्व प्रकारच्या व्यवसाय वाढीसाठी व व्यावसायिक वाहन खरेदीकरिता

### वैयक्तीक व्याज परतावा योजना

✻ ऑनलाईन अर्ज प्रक्रिया परिपूर्ण अर्जानंतर (LOI) मिळेल.
✻ बँक कर्ज मंजुरीनंतर कर्जाचे हप्ते नियमित व वेळेवर भरल्यास व्याज परतावा मिळेल.
✻ या योजनेची मर्यादा रू. १ लाख ते १५ लाखापर्यंत आहे.
✻ १५ लाखाच्या कर्जास ४.५ लाख व्याज परतावा करण्यात येतो.
✻ व्याज परताव्याचा कालावधी ५ वर्षे आहे.
✻ व्याज परतावा जास्तीत जास्त १२% दिला जातो.

### कर्ज कोणाला -

✻ कृषी सलंग्न पारंपारिक उपक्रमासाठी
✻ लघु मध्यम उद्योगासाठी
✻ उत्पादन, व्यापार, विक्री व सेवाक्षेत्रासाठी
✻ सदर कर्ज योजना प्रामुख्याने ओबीसी प्रवर्गाकरिता आहे.
✻ वयोमर्यादा १८ ते ५० असावे. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवाशी अनिवार्य आहे.
✻ कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या आत असावे.
✻ या योजनेत नवीन व्यवासाय सुरूवात करण्यासाठी व सध्या सुरू असलेला व्यवसाय - उद्योगवाढीसाठी घेतलेल्या कर्जास व्याजाचा परतावा दिला जातो.

### पात्रता प्रमाणपत्र (LOI) काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे -

✻ सध्या राहत असलेल्या ठिकाणाचा पुरावा. ✻ आधारकार्ड दोन्ही बाजू झेरॉक्स
✻ पॅनकार्ड ✻ रेशनकार्ड दोन्ही बाजूस ✻ कुटुंबाचा उत्पन्नाचा तहसिल दाखला
✻ ओबीसी जातीचा दाखला (तहसिलदार)
✻ आधार व पॅनकार्ड वरील जन्मतारीख एकसारखी असावी.

### गटप्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना

✻ ऑनलाईन अर्ज प्रक्रिया परिपूर्ण अर्जानंतर (LOI) मिळेल.
✻ बँक कर्ज मंजुरीनंतर कर्जाचे हप्ते नियमित व वेळेवर भरल्यास व्याज परतावा मिळेल.
✻ भागीदारी संस्था, सहकारी संस्था, बचत गट, एलएलपी कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट / संस्था लाभास पात्र असतील.
✻ या योजनेअंतर्गत किमान १ किंवा २ पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटांनी एकत्र येऊन
▸ दोन व्यक्तींसाठी व गटासाठी रू. १० ते ५० लाखांच्या मर्यादेवर
▸ गटातील लाभार्थ्यांचे किमान वय १८ ते ४५ असावे.

गटातील लाभार्थ्यांचे कर्जखाते आधारकार्ड लिंक असणे अनिवार्य. या योजनेमध्ये FPO गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरिता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील देखील व्याज परतावा नियमानुसार महामंडळ करेल.

✻ जास्तीत जास्त रू. १५ लाखापर्यंत व्याज रकमेचा परतावा.
✻ व्याज परताव्याचा कालावधी ५ वर्षे आहे.

### १ लाखापर्यंतचे थेट कर्ज योजना

✻ अर्जदाराचे वय १८ ते ५५ असावे. ✻ अर्जदाराचे सिबील स्कोर ७०० असावे.
✻ वार्षिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागाकरिता रू. १ लाख
✻ नियमित ४८ समान मासिक हप्त्यामध्ये मुद्दल रु. २०८५/- परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याज अदा करावे लागणार नाही. परंतु थकीत झालेल्या हप्त्यांवर द. सा. द. से. ४% व्याजदर आकारण्यात येईल.

## अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख

# लोकमंगल बँक

## लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥



प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर.
फोन : (०२१७) २७३५५०३/६६

## तुमच्या प्रगतीला... आमचं आर्थिक पाठबळ...!

## वसंतराव नाईकविमुक्त जाती व भटक्या जमातीविकास महामंडळ

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम

**(इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.)**

**₹ १५ लाखापर्यंत कर्जास**
**१२%* व्याज परतावा**
(* नियम व अटी लागू)

## सर्व प्रकारच्या व्यवसाय वाढीसाठी व व्यावसायिक वाहन खरेदीकरिता

### वैयक्तीक व्याज परतावा योजना

* ऑनलाईन अर्ज प्रक्रिया परिपूर्ण अर्जानंतर (LOI) मिळेल.
* बँक कर्ज मंजुरीनंतर कर्जाचे हप्ते नियमित व वेळेवर भरल्यास व्याज परतावा मिळेल.
* या योजनेची मर्यादा रू. १ लाख ते १० लाखापर्यंत आहे.
* १५ लाखाच्या कर्जास ४.५ लाख व्याज परतावा करण्यात येतो.
* व्याज परताव्याचा कालावधी ५ वर्षे आहे.
* व्याज परतावा जास्तीत जास्त १२% दिला जातो.

### कर्ज कोणाला -

* कृषी सलंग्न पारंपारिक उपक्रमासाठी
* लघु मध्यम उद्योगासाठी
* उत्पादन, व्यापार, विक्री व सेवाक्षेत्रासाठी
* सदर कर्ज योजना प्रामुख्याने भटक्या विमुक्त जमातीकरिता आहे.
* वयोमर्यादा १८ ते ५० असावे. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवाशी अनिवार्य आहे.
* कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाखाच्या आत असावे.
* या योजनेत नवीन व्यवासाय सुरूवात करण्यासाठी व सध्या सुरू असलेला व्यवसाय - उद्योगवाढीसाठी घेतलेल्या कर्जास व्याजाचा परतावा दिला जातो.

### पात्रता प्रमाणपत्र (LOI) काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे -

* जातीचा दाखला * उत्पन्न दाखला * रेशन कार्ड * शाळा सोडल्याचा दाखला * आधार कार्ड * कोटेशन * पत्ता पुरावा * रहिवासी दाखला * बँक पासबुक * लायसन्स (वाहनाकरिता) * डेअरी हमीमत्र (दुग्ध व्यवसायाकरिता )

### गटप्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना

* ऑनलाईन अर्ज प्रक्रिया परिपूर्ण अर्जानंतर (LOI) मिळेल.
* बँक कर्ज मंजुरीनंतर कर्जाचे हप्ते नियमित व वेळेवर भरल्यास व्याज परतावा मिळेल.
* भागीदारी संस्था, सहकारी संस्था, बचत गट, एलएलपी कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट / संस्था लाभास पात्र असतील.
* या योजनेअंतर्गत किमान १ किंवा २ पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटांनी एकत्र येऊन

▸ दोन व्यक्तींसाठी कमाल रू. १५ लाखांच्या मर्यादेवर
▸ गटातील लाभार्थ्यांचे किमान वय १८ ते ४५ असावे.
▸ गटातील लाभार्थ्यांचे कर्जखाते आधारकार्ड लिंक असणे अनिवार्य.

या योजनेमध्ये FPO गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरिता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील देखील व्याज परतावा नियमानुसार महामंडळ करेल.

* जास्तीत जास्त रू. १५ लाखापर्यंत व्याज रकमेचा परतावा.
* व्याज परताव्याचा कालावधी ५ वर्षे आहे.

### १ लाखापर्यंतचे थेट कर्ज योजना

* अर्जदाराचे वय १८ ते ५५ असावे. * अर्जदाराचे सिबील स्कोर ७०० असावे.
* वार्षिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागाकरिता रू. १ लाख
* नियमित ४८ समान मासिक हप्त्यामध्ये मुद्दल रु. २०८५/- परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याज अदा करावे लागणार नाही. परंतु थकीत झालेल्या हप्त्यांवर द. सा. द. से. ४% व्याजदर आकारण्यात येईल.

## अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा

# लोकमंगल फाऊंडेशन एक सामाजिक चळवळ

# लोकमंगल अन्नपूर्णा योजना

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥

**जीवनाचे संचित, तृप्त करू या वृद्ध वंचित !**



तुम्ही देणगी अथवा धान्य स्वरूपात
अन्नपूर्णा योजनेस मदत करू शकतात

| | |
|---|---|
| **१८२५०/-** एका लाभार्थ्याचा एक वर्षाचा खर्च | **२७५००/-** ५५० लाभार्थ्यांचा एक दिवसाचा खर्च |
| **७६५००/-** ५१ लाभार्थ्यांचा एक महिन्याचा खर्च | **८२५०००/-** ५५० लाभार्थ्यांचा एक महिन्याचा खर्च |

**धान्यरूपी देणगी स्वीकारली जाईल**

| प्रति महिना | |
|---|---|
| गहू | २४०० किलो |
| तांदूळ | १०२० किलो |
| गोडेतेल | ३४५ किलो |
| तूरडाळ | ४५० किलो |

**लोकमंगल बँक**
A/c No. 0020 0111 2000 1713
IFSC Code : IBKL0478LOC

**AXIS BANK**
A/c No. 2660 1010 0040 017
IFSC Code : UTIB0000266

'अन्नपूर्णा' १३-अ, सह्याद्री हाऊसिंग सोसायटी,
जुना होटगी नका, विकास नगर, सोलापूर - ४१३००३